# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

---

**दिनांक २६.०९.२०२६ शनिवार**

**नागपुर पोलीस आयुक्तालय, परिमंडळ क्र. ०५ अंतर्गत ०२ कुख्यात गुंड हद्दपार :—**

पोलीस ठाणे कळमना हददीत डिप्टी सिग्नल, रिग कुआ, शिवशक्ती मंदीर जवळ, कळमणा, नागपूर शहर येथे राहणारा गुन्हेगार ईसम नामे राहुल उर्फ येडा सेवकराम बबलु डहरे, वय २० वर्षे आणि पोलीस ठाणे यशोधरानगर हददीत प्लॉट न. ४१ शिवनगर, मांजरी, बरकत रजा मस्जीद मागे, यशोधरानगर, नागपूर शहर येथे राहणारा गुन्हेगार ईसम नामे वकील कुरेशी वल्द इब्राहीम कुरेशी, वय ५५ वर्षे यांचेविरूध्द पोलीस ठाणे कळमना व यशोधरानगर येथे लोकांना दमदाटी व मारपीट करणे, स्वेच्छेने दुखापत करणे, बेकायदेशीररित्या शस्त्र बाळगणे, गैरकायद्याची मंडळी जमवुन दंगा करणे, हातबुक्कीने मारुन शिवीगाळ करुन धमकी देणे, चोरी करणे, दरोडयाची पुर्वतयारी करणे ईत्यादी गंभीर स्वरूपाचे विविध गुन्हे दाखल असुन, त्यांचेवर वारंवार कारवाई करूनही त्याचे प्रवृत्तीत कोणतीही सुधारणा झाली नाही. नमुद गुन्हेगार इसमाचे वर्तणुकीत सुधारणा व्हावी, याकरीता कळमना व यशोधरानगर पोलीसांनी आरोपीविरूध्द हद्दपार प्रस्ताव तयार करून, मा. पोलीस उपायुक्त, परीमंडळ क्र. ०५ नागपुर शहर याचेकडे सादर केला. मा. पोलीस उपायुक्त, परीमंडळ क्र. ०५, नागपुर शहर यांनी गुन्हेगार क्र. १ यास हददपार आदेश क्र. ०७/२०२६ दिनांक १६.०९.२०२६ अन्वये नागपूर शहर व नागपुर ग्रामीण हद्दीतुन ०१ वर्षाकरीता हद्दपार करण्याचा तसेच, गुन्हेगार क्र. २ यास गुन्हेगारास हददपार आदेश क्र. ०८/२०२६ दिनांक २५.०९.२०२६ अन्वये नागपूर शहर व नागपुर ग्रामीण हद्दीतुन ०३ महीण्याकरीता हद्दपार करण्याचा आदेश पारीत केला आहे.

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक २५.०९.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये ३५ केसेसमध्ये ३९ ईसमावर कारवाई करून एकुण ३,६५,७५०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०३ केसेसमध्ये १३ इसमांवर कारवाई करून एकुण ३९,९९०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ओव्हरस्पीड वाहन चालविणे कलम १८४ मोवाका २५ केस, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये ०६ केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १३० मोवाका अन्वये ०९ केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये ७५ केसेस, रॉंग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये ४९ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४(ए) मोवाका अन्वये २० केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये ७० केसेस, धोकादायकरित्या बेदरकारपणे वाहन चालविणे कलम १८४ मोवाका ०१ केस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये ०५ केसेस, विदाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४बी(१) मोवाका अन्वये ११ केसेस, विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये ८९९ केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे १५ केस, ड्रंकन ड्राईव्ह**

**कलम १८५ मोवाका अन्वये ०५ केसेस व इतर कलमांखालील वेगवेगळे गुन्हे असे एकुण १,२०४ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. १,८०,०५०/—रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.**

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**<u>२) तहसील पोलीसांची कामगिरी :— ज्वेलर्स दुकानातुन दागीणे चोरी करणाऱ्या दोन आरोपींना अटक किंमती ३,७९,८५८/—रू. चा मुद्देमाल जप्त</u>**

फिर्यादी इस्लाम शेख वल्द शेख सिराजुल, वय ५७ वर्ष, रा. टिमकी, शारदा मंदीरचे बाजुला, तहसील, नागपूर यांचे पोलीस ठाणे तहसील हद्दीत मोमीनपुरा, अमनउल्ला मस्जिदचे बाजुला, आयत ज्वेलर्स नावाचे सराफा दुकान आहे. दिनांक २२.०९.२०२६ चे १४.३० वा. चे सुमारा, आरोपी मोहम्मद शोएब अकरम वल्द इम्तीयाज अन्सारी, वय २६ वर्षे, रा. धनवा, पोस्ट बरसोड, ता. बरी, जि. हजारीबाग (झारखंड)— ह.मु. हॉटेल आलिशान, रुम क्र. २०३, मोमीनपुरा, नागपूर याने फिर्यादीचे ज्वेलरी शॉपमध्ये येऊन, दागिने खरेदी करण्याचे बहाण्याने, दागिने पाहतांना, फिर्यादीची नजर चुकवुन, फिर्यादीचे दिशाभुल करून, खरे सोन्याचे दागिने ऐवजी बनावट बेन्टेक्सचे दागिने ठेऊन, फिर्यादीचे दुकानातुन सोन्याचे कानातील जोड चोरत असतांना, फिर्यादी यांनी त्यास पाहल्याने, त्यास पकडुन विचारपुस केली असता, त्याने यापुर्वीही असा प्रकार त्याचे साथीदारासह केल्याची कबुली दिल्याने, फिर्यादी यांनी पोलीसांना दिलेल्या तक्रारीवरून, तहसील पोलीसांनी आरोपींविरुध्द कलम ३०५,३(५) भान्यासं. अन्वये गुन्हा नोंदवुन आरोपीस अटक केली.

गुन्ह्याचे तपासात तहसिल पोलीसांनी आरोपीची सखोल विचारपुस केली असता, त्याने त्याचा साथीदार पाहीजे आरोपी मोहम्मद ऐनुल वल्द जेठुमिया अन्सारी, वय ३९ वर्ष, रा. प्लॉट नं. १७, बालाजी नगरी, बहादुरा फाटा, नागपूर याचेसोबत संगणमत करून वेळोवेळी फिर्यादीचे दुकानात दागिने खरेदी करण्याचे बहाण्याने जावुन, दागिने पाहुन परत येत होते व बाहेरून बनावटी बेनटेक्सचे दागिने सोबत आणुन दागिण्यांची अदला—बदली करून चोरी करीत होते असे सांगीतले. आरोपींनी वेळोवेळी वेगवेगळे सोन्याचे दागिने एकुण वजनी २५.९ ग्रॅम व चांदीची पायल जोड वजनी ८३.३३ ग्रॅम असा एकुण किंमती ३,७९,८५८/—रू. चा मुद्देमाल चोरुन नेल्याची कबुली दिली. दोन्ही आरोपींना गुन्ह्यात अटक करून, त्यांचे ताब्यातुन गुन्ह्यातील संपुर्ण मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राहुल मदने, पोलीस उप—आयुक्त (परि. क्र. ०३) नागपुर शहर, मा. श्री. राजेश तटकरे, सहा. पोलीस आयुक्त (कोतवाली विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. संजय मेंढे, पोउपनि. महेंद्र वासनिक, पोहवा. धनराज सिंगुवार, पोअं. मनोज नाकाडे, मपोअं. रूक्सार खान यांनी केली.



**३) कोतवाली पोलीसांची कामगिरी :— अग्नीशस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २५.०९.२०२६ चे १९.३५ वा. ते २०.३५ वा. चे दरम्यान, कोतवाली पोलीसांचे तपास पथकाने गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, गंगाबाई घाट नाल्याजवळ सापळा रचुन, मिळालेल्या वर्णनाचे ईसम एका दुचाकी बर्गमॅन गाडीवर दिसल्याने, त्यास थांबविले. पंचासमक्ष त्यास त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव पलाश उर्फ पल्या उमेश अग्ने, वय २५ वर्षे, रा. प्लॉट नं. २२३, प्रेरणा कॉलेज समोर, वकीलपेठ, ईमामवाडा, नागपुर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे जवळ एक अग्नीशस्त्र सिल्व्हर रंगाची पिस्टल मॅगझीनसह व दोन जिवंत काडतुस मिळुन आले. आरोपीस ताब्यातुन पिस्टल व काडतुस व बर्गमॅन मोपेड क्र. एम.एच ४९ सि.पी ४९४२ असा एकुण किंमती अंदाजे १,२७,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने अग्नीशस्त्र बाळगुन मिळुन आल्याने व त्यांनी मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे कोतवाली येथे आरोपीविरूध्द कलम ३, २५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राहुल मदने पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ३), मा. श्री. राजेश तटकरे, सहा. पोलीस आयुक्त (कोतवाली विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. प्रशांत जुमडे, पोउपनि. विजेंद्र नाचन, पोहवा. प्रसन्न दापुरकर, पोअं. सागर सगदेव, तुषार होलगडे, चेतन एडके व केशव पराडकर यांनी केली.



**४) गुन्हेशाखा पोलीसांची दारूबंदी, एनडीपिएस/प्रतिबंधीत तंबाखु (कोटपा) कायद्यांतर्गत धडक मोहीम :—**

मा. पोलीस आयुक्त, नागपुर शहर, मा. सह पोलीस आयुक्त, नागपुर शहर, मा. अपर पोलीस आयुक्त, (गुन्हे), मा. पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनात, गुन्हेशाखा पोलीसांनी नागपुर शहर अंतर्गत सर्व पोलीस ठाणे हद्दीत कायदा व सुव्यवस्थेचे दृष्टीने तसेच, गुन्हेगारांवर वचक बसावा याकरीता दिनांक २४.०९.२०२६ ते दिनांक २५.०९.२०२६ चे दरम्यान, ०२ दिवसीय विशेष मोहीम अंतर्गत अवैध दारू/अंमली पदार्थ/कोटपा अंतर्गत अवैध व्यापार करणारे ईसमांवर कारवाई तसेच, वाहनचोरीचा गुन्हे उघडकीस आणुन, मोठ्या प्रमाणात मुद्देमाल जप्त करून, आरोपींवर कायदेशीर कारवाई केली व त्यांचेविरोधात गुन्हे दाखल केले आहेत.

गुन्हेशाखा पोलीसांनी विशेष मोहीमेदरम्यान नागपुर शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत सर्व पोलीस ठाणे हद्दीत १) महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये कारवाई एकुण १८ केसेसमध्ये १९ ईसमांवर कारवाई करून ४५,१५०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला. २) एन.डी.पी.एस. कायद्यान्वये अंमली पदार्थ संबंधीत ०२ केसेसमध्ये ०२ आरोपींना अटक व ०१ विधीसंघर्षग्रस्त बालकास ताब्यात घेवुन, त्यांचे ताब्यातुन ६९ ग्रॅम ६०० मि.ग्रॅम असा

एकुण ११,३१,८००/—रू. चा मुद्देमाल जप्त केला. ३) शासन प्रतीबंधीत गुटखा व तंबाखु (कोटपा) कायद्यान्वये ०२ कारवाई करून, ०२ ईसमांना ताब्यात घेवुन त्यांचेवर गुन्हे दाखल करण्यात आले. ४) पोलीस ठाणे नंदनवन हद्दीतील वाहनचोरीचे गुन्ह्यातील ०२ आरोपींना अटक करून, त्यांचेकडुन ०३ दुचाकी वाहने जप्त करून, एकुण १,७०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. अशाप्रकारे गुन्हेशाखा पोलीसांनी एकुण २३ कारवाई करून, त्यामध्ये एकुण २३ आरोपींना अटक केली व त्यांचेकडुन एकुण १३,४६,९५०/—रू. चा मुद्देमाल जप्त केलेला आहे.

नागपुर शहरातील अवैध धंद्यावर प्रभावी नियंत्रण ठेवण्याकरीता गुन्हेशाखेकडुन सातत्याने कठोर व प्रभावी कारवाई करण्यात येत आहे. यापुढेही सतत कारवाई करून, विशेष मोहीम सुरू राहणार आहेत.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे अजनी :—** दिनांक २१.०९.२०२६ चे ०९.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे अजनी हद्दीत, मेडीकल हास्पीटल येथे आपात्कालीन रूग्णवाहीका मधुन एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ६० वर्षे वयाचे, यांना बेशुध्द अवस्थेत आणले होते. त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल, वार्ड क्र. ५२ येथे दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. मृतकाचे वर्णन—वय अं. ६० वर्षे, रंग सावळा, बांधा सडपातळ, चेहरा लांब, उंची ५ फुट ७ इंच, दाढी—मिशी बारीक, डोक्याचे केस काळे—पांढरे असे आहे. नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे अजनी येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे अजनी येथे मपोउपनि. गिता रासकर यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**स्वा/—**
**( नितीन चुलपार )**
**सहा.पोलीस निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**